सं.फौ.ख.क्र.६१/२०२५
शासन वि. राजकुमार
नि.क्र.१३

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१</u>**

नावः ललीत चांगदेव जुमनाके,

वयः ४० वर्ष, धंदाः जवान,

पत्ताः रा.उ.शु. ड विभाग पारशिवणी, जि. नागपूर,

**<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र.१ याचा सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.व्ही.तलमले यांच्यामार्फत शपथेवर सुरुः</u>**

**१.** मी दि. १९/१०/२०२४ रोजी रा.उ.शु.ड विभाग पारशिवनी येथे जवान पदावर कार्यरत होतो. त्या रोजी खबर मिळाली की आरोपी हा त्याच्या राहत्या घरी तामसावाडी सिंगोरी येथे अवैध्यरित्या दारु विक्री करीत आहे. त्यावरुन एस. एच. राजगडे, व पंचासह आरोपीच्या घरी गेलो. आरोपी तेथे दारु विक्री करतांना मिळून आला. एस. एच. राजगडे यांनी पंचनामा केला. देशी दारु भिंगरीच्या १३ निपा १८० मि.ली. क्षमतेच्या मिळून आले. घटनेची फिर्याद मी नोंदविली. आता मला छापील प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे त्यातील मजकूर बरोबर आहे त्यास **नि. क्र. १६** देण्यात येते. नमूना काढून आरोपी व पंचाची सही घेऊन सील केला. नमूना रासायनिक परिक्षणाकरिता घेऊन गेलो. आता मला रासायनिक परिक्षणाकरिताची प्रत दाखविली. त्यावर पत्र मिळाल्याबाबत प्रयागेशाळेतील लिपिकाची सही आहे. त्यास **नि. क्र. १७** देण्यात येते. मी आरोपीस ओळखतो. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण

**आरोपीतर्फे श्रीमती व्ही. टी. चौधरी वकील मॅडम यांचेमार्फत उलटतपास सुरु.**

२. हे म्हणणे खरे आहे की, दि. १९/१०/२०२४ रोजी मी कर्तव्यावर होतो याबाबत हजेरीपटाचा दस्त अभिलेखावर नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचा

घराचा क्रमांक सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, तामसवाडी व सिंगोरी हे दोन वेगवेगळे गाव आहेत.  हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या घरुन कोणतीही दारु जप्ती केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, रासायनीक परिक्षणाकरिता वेगळी काढली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

GAJENDRA ONKARRAO WANKHADE

Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2025.11.12 17:23:07 +0530

(**जी.ओ. वानखडे**)

न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

**समक्ष**

GAJENDRA ONKARRAO WANKHADE

Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2025.11.12 17:23:12 +0530

(**जी.ओ. वानखडे**)

न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

दिनांकः  १२/११/२०२५